जेंदुर्लभब्रह्मादिकां ॥ आजिसांपडलेंफुका ॥ घ्यारेह्मणे
तुका ॥ सावचित्तहोऊनी ॥ ६ ॥ ॥ ३८९५ ॥
तुझीयादासांचाहीनझालोंदास ॥ नधरींउदासमाय
बापा ॥ १ ॥ तुजविणप्राणकैसाराहोंपाहे ॥ वियोगन
साहेक्षणभरी ॥ २ ॥ आणिकमाझ्याजीवेंमोकलिली
आस ॥ पाहेतुझीवासपांडुरंगा ॥ ३ ॥ सर्वभावेंतुज
आणिलोंउचित ॥ राहिलोंनिश्चिंततुझेपाईं ॥ ४ ॥ तुका

ह्मणेतुजअसेमाझाभार ॥ बोलतांमीफारकायजाणे
॥५॥ ॥३८९६॥
तेचिकरीमात॥ जेणेंहोइलतुझेंहित॥ १॥ कायबडबड
नित्य ॥ सुखेंजिव्हासीणवित ॥ २ ॥ जोमुळव्याधि
पीडिला ॥ त्यासीदेखोनिहासेखरजुला ॥ ३॥ आरथ
करीसोसी ॥ त्यासीहासेतोआळसी ॥ ४ ॥ क्षयरोगी
ह्मणेपरता॥ सरेरोगीयाकुष्टता ॥५॥ वडसदोन्हीडोळां
वाढले ॥ आणिकातेकोचेबोले ॥६॥ तुकाह्मणेलाग
लोंपायां ॥ शुद्धकराआपणीया ॥७॥ ॥३८९७॥
कळोंआलाभावमाझामजदेवा ॥ वायांवीणजीवा
आटीकेली ॥ १ ॥ जाणोनिअक्षरेंकेलीतोंडपीटी ॥ न
लगेशेवटींहातींकांहीं ॥ २ ॥ देवजोडेह्मणुनसांगितलें
लोकां ॥ माझामीचदेखादुःखपावें ॥ ३ ॥ तुकाह्मणे
माझेगेलेदोन्हीठाय ॥ संसारनपायतुझेदेवा ॥ ४ ॥
॥३८९८॥
आतांतरीमजसांगासाचभाव ॥ कायम्यांकरावेंऐसें
देवा॥ १ ॥ चुकलियावर्मनव्हतेंकारण॥ केलाहोयशी
णअवघाची॥ २॥ कळेह्मणोनीयांकरितोविवाद॥ दि
सेभेदाभेदअंतरींचा ॥ ३ ॥ तुकाह्मणेनकोपाहोंतूंनि
र्वाण ॥ देईरुपादानयाचकांसी ॥ ४॥ ॥३८९९॥
बोलनाहींतुझ्यादातत्वपणासी ॥ आह्मीअविश्वासीस
र्वभावें ॥ १ ॥ दंभेंकरूंभक्तिसोंगदाऊंजना ॥ अंतरीं
भावनावेगळीया॥२॥ चित्तातूंरेसाक्षीतुजकळेसर्व॥

किंतीकरूंगर्वआतांपुढें ॥ ३ ॥ तुकाह्मणेदेवातूंकायक
रिसी ॥ कर्मदुस्तरासीआमूचिया ॥ ४ ॥ ॥३९००॥
नामधारकासीनाहींवर्णावर्ण ॥ लोखंडाप्रमाणनाना
जात ॥ १ ॥ शस्त्रअथवागोळेभलताप्रकार ॥ परिसी
संस्कारसकळहेम ॥ २ ॥ पर्जन्यवर्षताजीवनावाहवट॥
तेसमसगटगंगेमिळे ॥ ३ ॥ सर्वतेंहिजायगंगाचिहोऊ
नी ॥ तैसावर्णावर्णनाहींनामीं ॥ ४ ॥ महापुरींजैसेंजा
तसेउदक ॥ मध्यतेतारकनावजैसी ॥ ५ ॥ तयेनावेसं
गेंब्राह्मणतरती ॥ केवींतेबुडतीअनामीक ॥ ६ ॥ नाना
काष्ठजाळपडतांहुताशनी॥तेजातहोउनीयेकरूप ॥ ७॥
तेथेनिवडेनाघुरेकिचंदन ॥ तैसावर्णावर्णनाहींनामीं॥
॥ ८ ॥ पूर्वानुवोळखतेचिपैंमरण ॥ जरीपावेजीवन
नामामृत ॥ ९ ॥ नामामृतेंझालेंमूळींचेंस्मरण ॥ सह
जसाधनतुकाह्मणे ॥ १० ॥ ॥३९०१॥
कायवांचूनीयांझालोंभूमिभार ॥ तुझ्यापाईथारनाहीं
तरी ॥ १ ॥ जातांभलेंकायडोळियांचेंकाम ॥ जरीपुरुषो
त्तमनदेखती ॥ २ ॥ कायमुखबिळेंश्वापदाचेंधांव ॥
नित्यतुझेंनावनुच्चारीतां ॥ ३ ॥ तुकाह्मणेआतांपांडुरं
गाविण ॥ नवचेचिक्षणजीवभला ॥ ४ ॥ ॥३९०२॥
सोयऱ्यासिकरीपाहुणेरबरा ॥ कांहितोठोंबरासंतांसा
ठीं ॥ १ ॥ गाईदेखोनियाबदबदामारी ॥ घोड्याचीचाक
रीगोडवाटे ॥ २ ॥ पावेफुलेंनेतोवेश्येसीउदंड ॥ ब्राह्मणा
सीखांडनेदीकदा ॥ ३ ॥ पर्वकाळींधर्मनकरीनासरी ॥

वेचिराजद्वारींद्रव्यराशी ॥ ४ ॥ पुराणींबैसावयानाहीं
रिकामटी ॥ खेळतोसोंगटींरात्रदिवस ॥ ५ ॥ बाइलेच्या
गोताआवडीनेंपोसी ॥ मातापितयांसीदवडीतो ॥ ६ ॥
तुकाह्मणेत्याच्याथुंकातोंडावरी ॥ जातोयमपुरीभोगा
वया ॥ ७ ॥ ॥ ३९०३ ॥
कांहोपांडुरंगानकराधांवणें ॥ तरीमजकोणेंसोडवावें
॥ १ ॥ तुझाह्मणऊनीआणिकापेंऊभा ॥ राहोंहेंतोंशो
भानेदीआतां ॥ २ ॥ काळेंपुरवीलीपाठदूरवर ॥ पुढेंपा
यस्थीरराहोंनेदी ॥ ३ ॥ नकोआणूंमाझेंसंचितमानसीं ॥
पावनआहेसीपतिततूं ॥ ४ ॥ तुकाह्मणेचालेआणिका
चिसत्ता ॥ तुजआठवीतांनवलहें ॥ ५ ॥ ॥ ३९०४ ॥
कावळ्याच्यागळांमुक्ताफळमाळा ॥ तरीकायत्याला
भूषणशोभे ॥ १ ॥ गजालागींकेलाकस्तूरीचालेप ॥ तिचें
तोंस्वरूपकायजाणे ॥ २ ॥ बकापुढेंसांगेभावार्थेंवचन ॥
वाउगाचिशीणहोयत्यासी ॥ ३ ॥ तुकाह्मणेतैसेअभावि
कजन ॥ त्यांसीवायांशीणकरूंनये ॥ ४ ॥ ॥ ३९०५ ॥
नकळसीध्यानानकळसीज्ञाना ॥ नकळसीदर्शनाधुं
डाळीतां ॥ १ ॥ नकळसीआगमानकळसीनिगमा ॥
नबोलवेसीमाब्रह्मादीकां ॥ २ ॥ तुकाह्मणेतुझानाहीं
अंतपार ॥ ह्मणोनीविचारपडिलामज ॥ ३ ॥ ३९०६ ॥
पायालावोनियांदोरी ॥ भृंगबांधलालेंकरीं ॥ १ ॥ तै
सापावसीबंधन ॥ मगसोडवीलकोण ॥ २ ॥ गळांबां
धोनियांदोरी ॥ वानरहिंडवितीघरोघरीं ॥ ३ ॥ तुकाह्म

णेपाहे॥ रीसधापादेतआहे॥ ४॥ ॥ ३९०७॥

मायबापेंसांभाळिती॥ लोभाकारणेंपाळिती॥ १॥ तैसा नव्हेदेवराव॥ याचाकृपाळूस्वभाव॥ २॥ मनासारिखेंन होतां॥ बाळकासीमारीमाता ॥ ३ ॥ तुकाह्मणेसांगों किती॥ बापलेंकरामारीती॥ ४॥ ॥ ३९०८॥

धनमेळउनीकोटी॥ सर्वेंनयेरेलंगोटी ॥ १ ॥ पानेंखा सीलउदंड ॥ अंतींजासीसुकल्यातोंड ॥ २॥ पलंगन्या हाल्यासुपती॥ शेवटींगोंवऱ्यासंगाती ॥ ३ ॥ तुकाह्म णेराम॥ येकविसरतांश्रम॥ ४॥ ॥ ३९०९॥

विनवितोंचतुरातुजविश्वंभरा॥ परियेसिदातारापांडु रंगा॥ १ ॥ तुझदासऐसेजगींवाखाणीले॥ आतांनव्हे भलेंमोकलितां॥ २॥ माझेगुणदोषकोणजाणेमात॥ पावनपतितनामतुझें॥ ३॥ लोभमोहोमायाआह्माबा धेचिंता॥ तरीहाअनंताबोलकोणा॥ ४॥ तुकाह्मणेमी तोपतितचिखरा॥ परीआलोंदाताराशरणतुज॥ ५॥ ॥ ३९१०॥

त्राहेत्राहेआतांसोडवीं अनंता॥ लागोंदेममतातुझेपा ई॥ १॥ येकचिमागणेंदेईतुझीगोडी॥ नलावीआवडी आणिकांची॥ २॥ तुझेगुणनामवर्णीनपवाडे॥ आव डीच्याकोडेंनाचेंरंगीं॥ ३॥ बापाविठ्ठलरायाहेंचिदेईदा न॥ जोडतीचरणजेणेतुझे॥ ४॥ आवडीसारिखेंमागि तलेंजरी॥ तुकाह्मणेकरींसमाधान॥ ५॥ ॥ ३९११॥

सुगरणीबाईथीतानाशकेला॥ गुळतोघातलाभाजी

मध्यें॥ १॥ क्षीरीमध्येंहिंगदुधामध्येंबोळ॥थीतेंचिवों गळनाशकेला॥ २॥ हिरियाचेपेंठेआणियेल्यागारा॥ खांदींशिरींभाराव्यर्थवाहे॥ ३॥ दळणदळूनिभरियेलीं पाळीं॥ भरडोनिवोंगळीनाशकेला॥ ४॥ कापुराचेसा तेआणिलालसूण ॥ वागवितांशीणदुःखहोय ॥ ५॥ रत्नाचाजोहरीरत्नाचिपारखी॥येरदेखोवेखीहातींघेती ॥ ६॥ तुकाह्मणेजरीयोगघडेनिका ॥ नघडतांथुंकातों डावरी ॥ ७॥ ॥ ३९१२॥

माझेंजीवनतुझेपाय ॥ कृपाळूतूंमाझीमाय ॥ १॥ नेदि दिसोंकीविलवाणें ॥ पांडुरंगातुझेंतान्हें ॥ २॥ जन्मम रणतुजसाठीं॥ आणिकनेणेदुजीगोष्टी ॥ ३ ॥ तुकाह्म णेतुजवीण ॥ कोणहरीलमाझाशीण ॥ ४ ॥ ३९१३॥

कांरेप्रेमेंमातलासी ॥ उभेंकेलेंविठ्ठलासी ॥ १ ॥ ऐसा कैसारेतूंधीट ॥ मागेंभिरकाविलीवीट ॥ २ ॥ युगेंझा लींअठ्ठावीस ॥ आझुनिनह्मणसीबैस ॥ ३ ॥ भावदे खोनिनीकट ॥ देवेंसांडिलेंवैकुंठ ॥ ४ ॥ तुकाह्मणेपुंड लिका॥ तूंचिभक्तबळियानिका॥५॥ ॥ ३९१४॥

तुजपाहातांसामोरी ॥ दृष्टिनफिरेमाघारी ॥ १ ॥माझें चित्ततुझेपायां ॥ मिठिपडलीपंढरिराया ॥ २ ॥नव्हेसा रितांनिराळें ॥ लवणमेळवितांजळें ॥ ३ ॥ तुकाह्मणे बळी॥ जीवदिल्हापायातळीं॥ ४॥ ॥ ३९१५ ॥

उपदेशकितीकरावाखळासी ॥ नावडेतयासीबरवेंकां हीं ॥ १ ॥ शुद्धहेवासनानव्हेचांडाळाची॥ होळीसंचि

ताचीकेलीतेणें ॥ २ ॥ नाहींभावमनींनायकेवचन॥ आपल्याआपणनाडीयेलें॥ ३॥ तुकाह्मणेत्यासीकाय व्यालीरांड॥ करितोबडबडरात्रंदिवस॥ ४ ॥ ३९१६॥
समर्थासीलाजआपुल्यानावाची॥ शरणआलियाची लागेचिंता॥ १ ॥ नपाहेतयाचेगुणदोषअन्याय॥सुख देउनिसाहेदुःखत्याचें ॥ २ ॥ मानभलेपणनाहींफुका साठीं ॥ जयावरीगांठीझीजसाहे ॥ ३ ॥ तुकाह्मणेहेंतूं सर्वहिजाणसी ॥ मजअधिरासीधीरनाहीं ॥ ४ ॥ ॥
॥३९१७॥
आनंदेंकीर्तनकथाकरितिघोष ॥ आवडीचारसप्रेम सूख॥ १ ॥मजयाआवडेवैष्णवांचासंग ॥ तेथेनाहीं लागकळिकाळाचा॥ २ ॥स्वल्पमंत्रवाचेवैसलासेनी का॥रामकृष्णसखानारायण ॥ ३ ॥ विचारितांदुजें मनावाटेलाज॥उपदेशकाजआननाहीं॥ ४ ॥ तुकाह्म णेमनरंगलेंसेठाईं ॥ माझेंतुझ्यापाईंपांडुरंगा ॥ ५ ॥
॥३९१८॥
ब्रह्मज्ञानजेथेंआहेघरोघरीं॥सर्वनिरंतरीचतुर्भुज॥१॥ पापानाहींरीगकाळाचेंखंडण ॥ हरिनामकीर्तनपरोप री॥ २ ॥तुकाह्मणेहाचीभावमाझेचित्तीं॥ नाहींआणी कागतीचाडमज ॥ ३ ॥ ॥ ३९१९॥
मजनाहींकोठेउरलादुर्जन॥मायबापावीणब्रह्मांडिंही ॥ १ ॥ कासयाजिकीरकरणेयेविशीं ॥ भयाचीमान सींचिताखंती॥२॥विश्वंभराचियेलागलोंसांभाळी॥

संतनेतिचालीआपूलीया॥ ३ ॥तुकाह्मणेमाझेंपाळण
पोषण॥करीनारायणसर्वस्वेंसी॥ ४॥ ॥३९२०॥
नाहींहितठावेंजननीजनकां ॥ दाविलालौकिकाचार
तींहीं॥ १ ॥ आंधळ्याचेपाठींलागलेआंधळे॥ घातये
कवेळेमागेंपूढें ॥ २॥ नठेवावीचालीकरावाविचार॥
वरीलआहारगळीलावी॥३॥तुकाह्मणेकेलानिवाडा
रोकडा॥राउतहाघोडाहातोहातीं॥ ४॥ ॥३९२१॥
आतांपाहासीलकायमाझाअंत ॥ आलोंशरणागततू
जदेवा ॥ १ ॥ करीअंगीकारराखेंपायापासीं ॥ ह्मणी
दिसोंदेसीकींविलवाणें॥ २ ॥ नाहींआईकिलीमागेंऐ
सीमात ॥ जेत्वांशरणागतउपेक्षीले ॥ ३ ॥ तुकाह्मणे
आतांधरीअभिमान॥ आहेसीतूंदानशूरदाता ॥ ४ ॥
॥३९२२॥
भोगीलतोभोगभोगीनआपुला॥ नघालींविठ्ठलाभार
तूज॥ १ ॥ तुह्मापासावहेंइच्छितसेदान॥ अंतरींचेंध्या
नमुखींनाम ॥ २ ॥ नयेंकाकुलतीगर्भवासासाठीं॥ न
धरींहेपोटींभयकांहीं॥ ३ ॥ तुकाह्मणेमजउदंडयेवढें॥
नाचेनमीपुढेंमायबापा॥ ४॥ ॥३९२३॥
कोरडीयाऐशासांगोंकायगोष्टी ॥ कराउठाउठीहीतकां
हीं॥ १॥ खोळंबलाराहेआपलामारग॥ पाहावेंतोंमग
तुटीकोठे ॥ २ ॥ लौकीकाचाआडयेईलपसारा॥ मग
वेरझारादुःखदेती॥ ३॥ तुकाह्मणेडांकलागेअळंकारें॥
मगनव्हेखरेंपुटेवीण॥ ४॥ ॥३९२४॥

बोलणें तें आह्मी बोलों उपयोगीं ॥ पडिले प्रसंगीं काळा
ऐसें ॥ १ ॥ जया मध्यें देव आदि मध्यें अंतीं ॥ खोल पाया
भिंती न खचेची ॥ २ ॥ करणें तें आह्मी करूं येकवेळा ॥
पुढलीया बळा वाढी खुंटे ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी आज्ञेचीं
धारक ॥ ह्मणउनि येक ध्यारे सार ॥ ४ ॥ ॥ ३९२५ ॥
माझा हा स्वभाव आहे अनावर ॥ तुज देतां भार काय नव्हे
॥ १ ॥ ऐसें कळों आलें मज नारायणा ॥ जागृती स्वपना
ताळ नाहीं ॥ २ ॥ संपादिला तो हा अवघा बाह्यरंग ॥ तु
ह्मा नाहीं संग अभ्यंतरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सत्य नाहीं पाठी
पोट ॥ आहे तेनि घोटयेक जाती ॥ ४ ॥ ॥ ३९२६ ॥
काय तुझी ऐसी वेंचते गांठोळी ॥ माझी टाळाटाळी करी
तसा ॥ १ ॥ चतुराच्या राया अहो पांडुरंगा ॥ ऐसे तरी सां
गा निवडूनी ॥ २ ॥ कोण तुह्मां सुख आहे या कौतुकें ॥ भो
गीता अनेकें दुःखें आह्मीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे काय झालासी
निर्गुण ॥ आह्मा येथे कोण सोडवील ॥ ४ ॥ ३९२७ ॥
देवाची पूजा हे भूताचें पाळण ॥ मत्सर तो शीण बहुतांचा
॥ १ ॥ रुसावें फुगावें आपुलीयावरी ॥ उरला तो हरी सक
ळही ॥ २ ॥ तुका ह्मणे संतपण याचें नाव ॥ जरी होय जी
व सकळांचा ॥ ३ ॥ ॥ ३९२८ ॥
नाहीं जपतप जीवासी आटणी ॥ मनासी दाटणी नाहीं
केली ॥ १ ॥ निजीलीयां ठाईं पोकारीला धांवा ॥ सांकडें
तें देवा तूज माझें ॥ २ ॥ नाहीं आणूनियां समर्पीलें जळ ॥
सेवा तें केवळ चिंतनाची ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी वेंचलीं

उत्तरें ॥ घेतलींउदारेंमायबापें ॥ ४ ॥ ॥३९२९॥
देहतंव असेप्रारब्धाआधीन ॥ याचामीकांशीणवाहों
भार ॥ १ ॥ सरोमाझाकाळतुझियाचिंतनें ॥ कायावा
चामनेंइच्छीतसें ॥ २ ॥ लाभतोनदीसेयाहुनीदुसरा ॥
आणिकदातारायेणेंजन्में ॥ ३ ॥ तुकाह्मणे आलोंसोसी
तसंकटें ॥ मीमाझेंवोखटेंआहेदेवा ॥ ४ ॥ ३९३० ॥
सकळतुझेपाईमानीलाविश्वास ॥ नकरींउदासमज
आतां ॥ १ ॥ वाचेगातांगोडऐकतांतोकानीं ॥ पाहातां
लोचनींमूर्त्तीतुझी ॥ २ ॥ मनस्थीरमाझेंझालेंसेनिश्चळ ॥
वारीलसकळआशापाश ॥ ३ ॥ जन्मजराव्याधीनि
वारलेंदुःख ॥ वोसंडलेंसुखप्रेमधरी ॥ ४ ॥ तुकाह्मणे
मजझालानिरधार ॥ आतांवायांफारकायबोलों ॥ ५ ॥
॥३९३१॥
नयेमाझातुह्माहोऊंशब्दस्पर्श ॥ विप्रतुह्मीविद्वांसब्रा
ह्मणासी ॥ १ ॥ ह्मणउनितुह्माकरितोंविनंती ॥ द्यावेंशे
षहातींउरलेंतें ॥ २ ॥ वेदींकर्मजैसेबोलिलेंविहीत ॥ क
रावेंतेंनित्यविचारूनी ॥ ३ ॥ तुमचास्वधर्ममाझाअ
धिकार ॥ भजनउत्तरतुकाह्मणे ॥ ४ ॥ ॥३९३२॥
बहुतअसतीमागेंसुखींकेलीं ॥ अनाथामाउलीजीवा
चीतूं ॥ १ ॥ माझीयासंकटानधरींआळस ॥ लाउनियां
कासपारपावीं ॥ २ ॥ रुपावंताकराज्याचाअंगीकार ॥
तयासंवसारनाहींपुन्हा ॥ ३ ॥ विचारितांनाहींदुजाब
ळिवंत ॥ ऐसासर्वगतव्यापीकोणी ॥ ४ ॥ तुकाह्मणेना

हींजाणतआणीक॥ तुजविणयेकपांडुरंगा॥ ५॥

॥३९३३॥

आह्मादेणेंधरासांगतोंतेंकानीं॥ चिंतापायमनींविठो बाचे॥ १॥ तेणेंचित्ताहोयखरेंसमाधान॥ विलासमि ष्टान्ननलगेसोने॥ २॥ व्रतयेकादशीदारींवृंदावन॥ कंठींल्यारेलेणेंतुळसीमाळा॥ ३॥ तुकाह्मणेत्याचीघ रींचीउष्टावळी॥मजतेदिवाळीदसरासण॥४॥३९३४

आतांअनन्यनव्हेअधिकारी॥ होईलकोणपरीनेणेंदे वा॥ १॥ पुराणींचाअर्थआणितांमनास॥होतोकासा वीसजीवमाझा॥२॥इंद्रियांचेआह्मीपांगीलोंअंकीत॥ त्यांचेसंगेंचित्तरंगलेंतें॥३॥ येकाचेंहेंमजनघडेहेंदान॥ अवघिनेमूनकैसीराखों॥ ४॥ तुकाह्मणेजरीमोकली सीआतां॥ तरीमीअनंतावायांगेलों॥ ५॥ ३९३५॥

आवडीधरूनीआलेतीआकार॥ केलाहापसाराजया साठीं॥ १॥ तेमीतुझेंनामगाईनआवडी॥ क्षणयेक घडीविसंबेना॥ २॥ वर्मजाणावेंहेंमुख्यधर्मसार॥ अ वघेप्रकारतयापोटीं॥ ३॥ वेगळाल्याविच्यारेंवेगळा ल्याभाव॥ धरायासीठावबहुनाहीं॥ ४॥ तुकाह्मणे घालूंइच्छेचियेपोटीं॥ कवळूंधाकुटीमूर्त्तीजीवें॥ ५॥

॥३९३६॥

भागलोंमीआतांआपुल्यास्वभावें॥ कृपाकरुनिदेवें आश्वासीजे॥१॥ देउनिआलिंगनप्रीतीच्यापडिभरें॥ अंगेंहींदातारेंनीववावीं॥ २॥ अमृताचीदृष्टीघालूनि

पांवरी॥ शीतळहाकरींजीवमाझा ॥ ३ ॥ घेईउचलोनी
पुसेतानभूक॥ पुसेमाझेंमुखपीतांबरें ॥ ४॥ बैसोनियां
माझीधरीहनुवटी ॥ वोवाळुनीदीठीकरूनिसांडी ॥ ५॥
तुकाह्मणेबापाअहोविश्वंभरा ॥ आतांकृपाकराऐसी
कांहीं॥६॥ ॥३९३७॥
नसरेलुटीतांमागेंबहुतांजणीं ॥ जुनाटहेखाणीउघडि
ली ॥१॥ ऋषीमुनीसिद्धसाधकसंपन्न॥ तींहींहेंजतन
केलेंहोतें॥ २॥ पायाळाच्यागुणेंपडिलेंठाउकें॥जगापुं
डलीकेंदाखविलें॥ ३॥ तुकाह्मणेतेथेंहोतोंमीदुबळा॥
आलेंयाकपाळाथोडेंबहु॥ ४॥ ॥३९३८॥
भगवेंतरीश्वानसहजवेषत्याचा॥तेथेअनुभवाचाकाा
यपंथ॥ १॥ वाढऊनिजटाफिरेदाहीदिशा॥ तरीजंबुवे
शासहजस्थिती॥ २॥ कोरुनियांभूमिमध्येंकरीवास॥
तरीउंदिरासकायवाणी॥ ३॥ तुकाह्मणेऐसेंकासया
करावें॥ देहासीदंडावेंवाउगेंची॥ ४॥ ॥३९३९॥
धन्यदिवसआजीडोळीयांलाधला ॥ आनंददेखिला
धणीवरी॥ १॥ धन्यझालेंमुखरंगलीरसना॥ नामना
रायणाघोषकरी॥ २॥ धन्यहेमस्तकसर्वांगशोभलें॥
संतांचींपाउलेंलागताती॥ ३॥धन्यआजिपंथचालती
पाऊलें॥ टाळियाशोभलेकरदोन्ही॥ ४॥धन्यतुकाह्म
णेआह्मासिफावलें॥पावलोंपाऊलेंविठोबाचीं॥ ५॥
॥३९४०॥
बरवीहेवेळसांपडलीसंधी॥ साध्यझालीबुद्धीसंचीता

ची ॥ १ ॥ येणेंपंथेंमाझींचाललींपाऊलें ॥ दरुशनझा
लेंसंतांपाईं ॥ २ ॥ त्रासिलेंदरिद्रेंदोषाझालाखंड ॥ त्या
चेकाळेंपिंडपुनितझाला ॥ ३ ॥ तुकाह्मणेझालाअवघा
व्यापार ॥ आलीवेरझारफळासीहे ॥ ४ ॥ ॥ ३९४१ ॥
आपणालागींकामवाण्याघरींगुळ ॥ त्याचेंयातिकूळ
कायकीजे ॥ १ ॥ उखरव्यावरीवाढिलीतुळसी ॥ टाका
वितेकैसीठायागुणें ॥ २ ॥ गाइचाजोभक्षअमंगळखा
य ॥ तिचेंदुधकायसेऊंनये ॥ ३ ॥ तुकाह्मणेकायसाल
पटासिकाज ॥ फणसांतिलबीजकाढुनघ्यावें ॥ ४ ॥
॥ ३९४२ ॥
जयासीनावडेवैष्णवांचासंग ॥ जाणावातोमांगज
न्मांतरींचा ॥ १ ॥ अपवित्रवाचाजातीचाअधम ॥ आ
चरणधर्मनाहींजया ॥ २ ॥ मंजुळवदनींवचनागाची
कांडी ॥ शेवटींचिघडीजीवप्राणा ॥ ३ ॥ तुकाह्मणेज्या
चापितानाहींशुद्ध ॥ तयासिगोविंदअंतरला ॥ ४ ॥
॥ ३९४३ ॥
वांजेनेंदाविलेंगरवारपण ॥ चिरगुटेंघालूनवाथयाला
॥ १ ॥ तेचिशब्दह्मणीकरितिचावटीं ॥ ज्ञानपोटासा
ठींविकूनीयां ॥ २ ॥ बोलाचिचकढीबोलाचाचिभात ॥
जेउनियांतृप्तकोणझाला ॥ ३ ॥ कागदींलिहितांनावा
चिसाखर ॥ चाटितांमधुरगोडीनेदी ॥ ४ ॥ तुकाह्मणे
जळोजळोतेमहंती ॥ नाहींलाजचित्तींनिसुंगाला ॥ ५ ॥
॥ ३९४४ ॥

माझीयापाळणेवोढेमाझेंमन॥ गेलाविसरोनदेहभाव ॥ १ ॥ लागलापालटफेडणेंउसणें ॥ येणेचिप्रमाणेंपां डुरंगा॥ २॥ तुकाह्मणेमाझाजीवजैसावोढे ॥ तैसेंचि तिकडेपाहिजेलें॥ ३॥ ॥३९४५॥

मीदासतयाचाजयाचाडनाहीं॥ सुखदुःखदोहींविरही तजो॥१॥ राहिलासेउभाभींवरेच्यातीरीं॥ कटदोहींक रींधरूनीयां ॥ २॥ नवलकायतरीपाचारितांपावे॥न श्वरितांधांविभक्तिकाजा ॥ ३ ॥ सर्वभारमाझात्यासी आहेचिंता॥ तोचिमाझादातास्वहिताचा ॥ ४॥ तुका ह्मणेत्यासीगाइनमीगीतीं ॥ आणिकतेचित्तींनधरी कांहीं॥५॥ ॥३९४६॥

झुंझायाच्यागोष्टीऐकतांचिसुख ॥ करितांदेहेंदुःखथो रआहे॥ १ ॥ तैसिहरिभक्तिशूळावरिलपोळी॥ निवडे तोबळीविरळाशूर॥ २॥ पिंडपोषिलीयाविषयाचापा ईक॥ वैकुंठनायककैंचातेथे ॥ ३॥ तुकाह्मणेव्हावेदेहा सीउदार॥रखुमादेवीवरजोडावया ॥ ४॥ ३९४७ ॥

अंगींब्रह्मक्रियाखिस्तीचाव्यापार॥ हिंडेघरोघरचांडा ळाचे॥१॥ अंत्यजाचीखिचडीघेतातीमागून ॥ गाळि याप्रमाणमायबहिणी॥२॥ उत्तमकुळींजन्मक्रियाअ मंगळ॥ बुडविलींकुळेंउभयतां ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐसी कलियुगाचाली॥ स्वार्थेंबुडविलींआचरणें ॥ ४॥ ॥३९४८॥

पाषाणप्रतीमासोन्याच्यापादुका॥हेतोहातींयेकासम

र्थाच्या॥१॥अनामिकाहातींसमर्थाचाशिक्का॥नमानि
तांलोकांयेइलकळों॥२॥तुकाह्मणेयेथेदुराग्रहखोटा॥
आपुल्याअदृष्टाशरणजात्तें॥३॥ ॥३९४९॥
बहुयाप्रपंचेंभोगविल्याखाणी॥टाकोनियांमनींआ
लाशीण॥१॥आतांपायांपासींलपवावेंदेवा॥नको
पाहूंसेवाभक्तीमाझी॥२॥बहुभयवाटेयेकाच्यावोझा
टें॥आलियाघायखोटेफिरोनीयां॥३॥तुकाह्मणेसी
गेभरोंआलेंमाप॥वियोगसंतापझालातुझा॥४॥
॥३९५०॥
धरोनीयांमनींबोलिलोंसंकल्प॥होसीलतरीबापसि
द्धीनेई॥१॥उत्कंठाहेआजीआलीमाझ्यापोटीं॥मा
गीलयागोष्टीटाळाटाळी॥२॥माझामजअसेठाउका
निर्धार॥उपाधीउत्तरनसाहेंपें॥३॥तुकाह्मणेतुजदि
ल्हीआठवण॥तरीअभिमानधरींमाझा॥४॥३९५१॥
आजिवरीहोतोंसंसाराचेहातीं॥आतांऐसेंचित्तींउप
जलें॥१॥तुझाशरणागततारींनारायणा॥अंगीका
रींदीनाआपूलीया॥२॥विसरलोंकामयाजसाठींधं
दा॥सकळगोविंदामाझेंतुझें॥३॥तुकाह्मणेविज्ञाप
नापरीसावी॥आवडीहेजीवींझालीतैसी॥४॥३९५२
धन्यधन्यज्यासपंढरीचावास॥धन्यतेजन्मासप्राणी
आले॥१॥चहूंखाणीमध्येंहोताकोणीयेक॥क्रिमीर
कीटकपक्षीराज॥२॥उत्तमचांडाळनरनारीबाळ॥
अवघेसकळचतुर्भुज॥३॥अवघाविठ्ठलतेथेदुजें

नाहीं ॥ भरलें अंतरबाहींसदोदित ॥ ४ ॥ तुकाह्मणेतेथें
होउनिराहीन॥ सांडोवापाषाणपंढरीचा॥५॥३९५३॥
असंतलक्षणभूतांचामत्सर ॥ मनासीनिष्ठूरअतीवादी
॥ १ ॥ अंतरींचारंगउमटेबाहेरी ॥ वोळखीयापरीआपे
आप ॥ २ ॥ संततेसमयवोळखतीवेळ ॥ संतुष्टनिर्मळ
चित्तसदा ॥ ३ ॥ तुकाह्मणेहीतउचीतअनुचीत ॥ मग
लागेनित्यविचारावें ॥ ४ ॥ ॥३९५४॥
आतांकायखावेंकोणीकडेजावें ॥ गांवांतराहावेंको
ण्याबळें ॥ १ ॥ कोपलापाटीलगांवींचेहेलोक ॥ आ
तांमजभीककोणघाली ॥ २ ॥ आतांयेणेचवीसांडिली
ह्मणती॥निवाडकरितीदिवाणांत ॥३ ॥ भल्यालोकांपा
सींसांगितलीमात ॥ केलामाझाघातदुर्बळाचा ॥४॥तु
काह्मणेयाचासंगनव्हेभला॥ शोधीतविठ्ठलाजाऊंआ
तां॥५॥ ॥३९५५॥
विठ्ठलावांचूनब्रह्मजेबोलती ॥ वचनतेंसंतींमानूंनये॥
॥ १ ॥ विठ्ठलावांचूनजेजेउपासना ॥ अवघाचिजाणा
श्रमचितो ॥ २ ॥ विठ्ठलावांचूनीसांगतीजेगोष्टी ॥ वा
यांतेहिंपुटीहोतीजाणा ॥ ३ ॥ विठ्ठलावांचूनीकांहींजे
जाणती ॥ तितक्याविपत्तीवाबूगीया ॥ ४ ॥ तुकाह्मणे
येकविठ्ठलचिखरा ॥ येरतोपसारावाउगाची ॥ ५ ॥
॥३९५६॥
सर्वकाळडोळांबैसोनारायण ॥ नयोअभिमानआड
पुढें ॥ १ ॥ धाडपडोमाझ्याथोरपणावरी ॥ वाचेहरिह

रिउच्चारीन ॥ २ ॥ जळोअंतरीचेंसर्वजाणपण ॥ वेवा
दवचनअहंतेचें ॥ ३ ॥ सकळाचरणींगळितमाझाजी
व ॥ तुकाह्मणेभावयेकविध ॥ ४ ॥ ॥ ३९५७॥
मधुराउत्तरासवेंनाहींचाड ॥ अंतरंगींवेडप्रेमअसो ॥
॥ १ ॥ प्राणावेगळानकरीनारायण ॥ मगनसोज्ञानमू
र्खबरा ॥ २ ॥ जननिंदाहोयतोनकरावाव्यापार ॥ थो
रीविचाभारकामानये ॥ ३ ॥ तुकाह्मणेभावनिष्ठावंत
चित्तीं ॥ दयाक्षमाशांतीसर्वभूतीं ॥ ४ ॥ ॥ ३९५८॥
वोरपोनिझाडेंखावोनीयांपाला ॥ आठवींविठ्ठलावेळो
वेळां ॥ १ ॥ वल्कलेंनेसूनिचिंधीयांवेढूनी ॥ सांडीजव
ळुनीदेहभान ॥ २ ॥ लोकमानवमनासमानमानणें ॥
येकांतींराहाणेंविठोसाठीं ॥ ३ ॥ सहसाकरूंनयेप्रपंचीं
सौजन्य ॥ सेवावेंअरण्ययेकांतवास ॥ ४ ॥ ऐसाहानि
र्धारकरीजोमनाचा ॥ तुकाह्मणेत्याचापांगफीटे ॥ ५ ॥
॥ ३९५९ ॥
भक्तिभावेंकरीवैसोनिनिश्चित ॥ नकोगोऊंचित्तप्रपं
च्यासी ॥ १ ॥ येकदृढधरींपंढरीचाराव ॥ मगतुजउपा
वपुढिलसुचे ॥ २ ॥ नकोकरूंकांहींदेवतापूजन ॥ जपतप
ध्यानतेंहिनको ॥ ३ ॥ मानसीलज्ञणिआपुलीयाकांहीं ॥
वेरझारपाईनचुकेकदा ॥ ४ ॥ येथेजन्मकितीपावलासी
देहीं ॥ अझुनीकांनाहींकळेसोय ॥ ५ ॥ सोयधरींआतां
होयतूंसावध ॥ अनुभवआनंदआहेकैसा ॥ ६ ॥ सहज
कैसेंआहेतेथींचेंहेंगूज ॥ अनुभवेंनिजपाहेतुकी ॥ ७ ॥

तुकाह्मणेआतांहोईंतूंसावध॥तोडींभवबंधयेकाजन्में ॥८॥ ॥३९६०॥

दोराचेआधारेंपर्वतचढला॥पाउलासीकेलाअपघात ॥१॥ अष्टोत्तरशेंव्याधिवैद्यदवडुनी॥तोवैद्यमारूनीउत्तीर्णता॥ २॥नऊमासमायेवाहिलेंउदरीं॥तेमाताचौवारीनग्नकेली॥ ३ ॥गाइत्रींचेंक्षीरपिळोनिघेवोनी॥ उपवासीबांधोनीताडितसे॥ ४ ॥तुकाह्मणेगुरुनिंदकाचेतोंड॥पाहतांनर्ककुंडपूर्वजांसी॥५॥ ॥३९६१॥

नकळेब्रह्मज्ञानआचारविचार ॥ लटीकावेव्हारकरीतसे॥ १ ॥विश्वामित्रिपोटींतयाचाअवतार॥नाममहाखरचांडाळाचें ॥ २ ॥ द्रव्यइच्छेसाठींकरितसेकष्टा॥ कायत्यापापिष्टानमिळेखाया ॥ ३ ॥ पोटपोसावयातोंडबडबडी॥नाहींधडफुडीयेकीगोष्टी ॥ ४ ॥ तुकाह्मणेतयाकायव्यालीरांड ॥ येउनियांभांडजनामध्यें ५॥ ॥३९६२॥

नित्यउठोनीयांखाववयाचिचिंता ॥ आपुल्यातूंहीतानाठवीसी ॥ १ ॥ जननिचेपोटींउपजलासिजेव्हां ॥ चिंतातुझीतेव्हांकेलीतेणें ॥ २ ॥ चातकालागूनीमेघनित्यवर्षे ॥ तोतुजउदासकरीलकेंवी ॥ ३॥पक्षीवनचरेंआहेतभूमिवरी॥तयांलागींहरिउपेक्षीना॥ ४॥तुकाह्मणेभावधरुनिराहेचित्तीं॥तरीतोश्रीपतिउपेक्षीना॥ ॥ ५॥ ॥३९६३॥

जेजेकेलीआलीतेंतेंगेलीवायां ॥ उरलापंढरिरायाश्र

ममाझा ॥ १ ॥ कायसमाधानकेलेंकोणेवेळे॥ कोण
मांझेलळेपाळियेले ॥ २ ॥ आभासतोनाहींस्वप्नींहिदु
श्चिता॥ प्रत्यक्षबोलतांकायचिंता॥ ३ ॥ आतांपुढेंला
जवाटेपांडुरंगा॥ भक्तऐसेंजगामाजीझालें॥ ४ ॥ तुका
ह्मणेआतांनाहींभरवसा ॥ मोकलिसीऐसावाटतो
सी॥ ५॥ ॥ ३९६४॥
पूर्वीहुनिबहुभक्तसांभाळिले॥नाहींआव्हेरिलेदासको
णी॥ १ ॥ जेजेशरणआलेतेतेआपंगीले ॥ पवाडेविठ्ठ
लेऐसेतुझे॥ २ ॥ मिरवेचरणींब्रीदऐसियागोष्टीचें ॥भ
क्तसांभाळाचेंप्रेमऐसें ॥ ३॥ तुकाह्मणेआह्मासाठींये
णेंरूपा॥ माझ्यामायबापापांडुरंगा॥ ४॥ ॥ ३९६५॥
दर्दुराचेंपिलूंह्मणेरामकृष्ण ॥ नाहींउदकउष्णहोऊंदि
ल्हें॥ १ ॥ कढमाजीबाळकरीतळमळ ॥ गोविंदगोपा
ळपावेंवेगा॥ २॥ आज्ञातयेकाळींकेलीपावकासी ॥
झणिपिलीयांसिपावविसी ॥ ३ ॥ तुकाह्मणेतुझेंऐसेहे
पवाडे॥ वर्णितांनिवाडेसुखवाटे ॥ ४ ॥ ॥ ३९६६ ॥
करुणाबहूततुझीयेअंतरा ॥ मजविश्वंभराकळोंआ
लें ॥ १ ॥ पक्षियासितुझेंनामजेंठेविलें ॥ तयेउद्धरिलें
गणिकेसी॥२॥ कुंटणीतेबहुदोषआचरली॥नामघेतां
आलीकरुणातुज॥ ३ ॥ हृदयकोमळतुझेंनारायणा॥
ऐसेंबहुतजनातारीयेलें ॥ ४ ॥ तुकाह्मणेसीमानाहींतु
झदये॥ कोमळहृदयपांडुरंगा ॥ ५ ॥ ॥ ३९६७॥
अजिअजामीळाअंतमरणासी ॥ आलातोतुजसी

स्मरलानाहीं॥ १ ॥ प्राणजातेवेळेह्मणेनारायण ॥ त्या
साठींविमानपाठवीलें ॥ २ ॥ बहुतकृपाळहोसीजग
न्नाथा ॥ त्रैलोक्यसमर्थासोयरीया ॥ ३ ॥ तुकाह्मणेभ
क्तकाजतूंकैवारी ॥ तुजसाहीचारीवर्णिताती ॥ ४ ॥
॥३९६८॥

धर्मरक्षावयाअवतारघेसीं॥ आपुल्यापाळीसीभक्तज
ना ॥ १ ॥ अंबरीषीसाठींजन्मसोसियेले ॥ दुष्टनिर्दा
ळिलेकितीयेक ॥ २ ॥ धन्यतुजकृपासिंधुह्मणतील ॥
आपुलातोबोलसाचकरी॥ ३ ॥ तुकाह्मणेतुजवर्णिती
पुराणें॥ होयनारायणदयासिंधु॥ ४॥ ॥३९६९॥

येऊनजाऊनीपाहेतुजकडे॥पडिल्यासांकडेंनारायणा
॥ १ ॥ आणिककोणाचामजनाहींआधार॥ तुजवरी
भारजीवेंभावें ॥ २ ॥ निष्ठुरअथवाहोसीतूंकृपाळ॥ तु
जसर्वकाळविसरेना॥ ३ ॥ आपुलेंवचनराहावेंसांभा
ळुन ॥ तुह्माआह्माजाणपडीपाडूं ॥ ४ ॥ ज्याच्यावच
नासीअंतरपडेल॥ बोलतोयेईलतयाकडे॥ ५ ॥ तुह्मा
आह्मातैसेंनाहींह्मणेतुका ॥ होसीलतूंसखाजीवलग॥
॥६॥ ॥३९७०॥

ऐकनारायणावचनमाझेंखरें॥ सांगतोंनिर्धारेंतुजपा
सीं ॥ १ ॥ नाहींभावमजपडिलीलोकलाज॥ राहिलें
सेकाजतुझेपाईं॥ २ ॥ जरीतुजकांहींकरणेंउचित॥ त
रीहापतीततुकाह्मणे॥ ३॥ ॥ ३९७१॥

अनाथपरदेसीहीनदीनभोळें ॥ उगलेचिलोळेंतुझेरं

गीं ॥ १ ॥ आपुलें ह्मणावें मज नुपेक्षावें ॥ प्रेमसुख द्यावें मायबापा ॥ २॥ कासवीचे परी पाहें दृष्टि मज ॥ विझानीउ मज देऊनीयां॥३॥ तुका ह्मणे तुझे झालें शरणागत॥ कायावाचाचित्त दुजें नाहीं ॥ ४॥ ॥ ३९७२॥
पावलों पंढरी वैकुंठभुवन॥ धन्य आजी दीन सोनियाचा ॥ १ ॥ पावलों पंढरी आनंदगजरें॥ वाजती लतुरे शंख भेरी॥ २ ॥ पावलों पंढरी क्षेम आलिंगनें ॥ संतया सज्जनें निववीलों ॥३॥ पावलों पंढरी पार नाहीं सुखा॥ भेटला हा सखा मायबाप ॥ ४ ॥ पावलों पंढरी वेरझार खुंटली ॥ माउली वोळली प्रेमपान्हा ॥ ५ ॥ पावलों पंढरी आपुलें माहेर ॥ नाहीं संवसार तुका ह्मणे ॥ ६ ॥ ॥ ३९७३॥
अभयदान मज देईं गा उदारा॥ कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥ १ ॥ देहभाव तुझ्या ठेवियेला पाईं ॥ आणिक मी कांहीं नेणें दुजें॥ २॥ सेवाभक्तिभाव नेणें मी पतीत ॥ आतां माझें हित तुझे पाईं ॥ ३ ॥ अवघा निरोपिला तुज देहभाव ॥ आतां मज पाव पांडुरंगा ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुझें नाव दीनानाथ ॥ तें मज उचीत करीं आतां ॥५॥ ॥३९७४॥
खिस्तीचा उदीम उदीमांत हीन ॥ करिती ब्राह्मण कलीयुगीं ॥ १ ॥ वेवसाव करी पर्वत मांगासी ॥ तेंपें विटाळासी न मानिती ॥ २॥ मांगणीसी नित्य करितसे लेखा॥ तोंडावरी थुंका पडतसे ॥ ३ ॥ आशा माया रांडा नामहें कागदीं॥ आठविना कधीं नारायण ॥ ४ ॥ तुका ह्मणे देह झालें पराधीन॥ पांडुरंगावीण गति नाहीं॥५॥ ३९७५॥

लागेतुझीसोयऐसेंकरींकांहीं ॥ माझेंविठाबाईजननी
ये ॥ १ ॥ पतितपावनह्मणवीसीजरी ॥ अव्हेरनकरींत
रीमाझा॥ २॥ नाहींतरीब्रीदटाकींसोडूनियां ॥ नधरिसी
मायाजरीमाझी ॥ ३ ॥ बोलिलातोबोलकरावासाचा
र ॥ तरीलोकबरेंह्मणतील ॥ ४ ॥ करावासंसारलोक
लाजेभेणें ॥ वचनासीउणेंयेऊंनेदी ॥ ५ ॥ तुह्मा आह्मा
तैसेंनाहींह्मणेतुका ॥ होसीलतूंसखाजीवलग ॥ ६ ॥
॥ ३९७६ ॥
आह्मातूंसोयरासज्जनसंगाती॥तुजमजप्रीतिचालोस
दा॥ १ ॥ तूंमाझाजिव्हाळाजीवींचाजिवलग ॥ होशी
अंतरंगअंतरींचा॥ २ ॥ गणगोतमित्रतूंमाझेंजीवन॥
अनन्यशरणतूझ्यापाईं ॥ ३ ॥ तुकाह्मणेसर्वगुणेंतुझा
दास॥ आवडेअभ्याससदातुझा॥ ४॥ ॥ ३९७७॥
आवडेलतैसेंतुजआळवीन॥ वाटेसमाधानजीवातैसें
॥ १ ॥ नाहींयेथेंकांहींलौकिकाचीचाड ॥ तुजवीणगो
डदेवराया॥ २॥ पुरवींमनोरथअंतरींचेअर्थ॥ धायव
रीगीतगायतूझें॥३॥ तुकाह्मणेलोकींआळवीमाहेरा॥
गाऊंयासंसारातूजतैसें ॥ ४ ॥ ॥ ३९७८ ॥
माझेंमुखनामींरंगोसर्वकाळ ॥ गोविंदगोपाळरामकृ
ष्ण ॥ १ ॥ अबद्धवाकडेंगाऊंभलतैसें ॥ बाळवदेजैसेंमा
यबापा॥ २॥ तुकाह्मणेमजनलवीवाकडें ॥ मीतुझेंबो
बडेंबाळतान्हें ॥ ३ ॥ ॥ ३९७९ ॥
यालागीआवडीह्मणारामकृष्ण ॥ जोडानारायणसर्व

काळ ॥ १ ॥ संपेंहेंसाधनलाभयेतोघरा ॥ वाचेसीउ
च्चारारामहरी ॥ २ ॥ नलगतीकष्टनलगेसायास ॥ करा
वाअभ्यासविठ्ठलाचा ॥ ३ ॥ नलगेतपतीर्थनलगेम
हादान ॥ केल्यायेकमनजोडेहरी ॥ ४ ॥ तुकाह्मणेकां
हींनवेंचितांधन ॥ जोडेनारायणनामासाठीं ॥ ५ ॥
॥ ३९८० ॥

झांकोनियांनेत्रकायजपतोसी ॥ जोनाहींमानसींप्रेम
भाव ॥ १ ॥ रामरामह्मणाउघडामंत्रजाणा ॥ चुकती
यातनागर्भवास ॥ २ ॥ मंत्रयंत्रसाध्याकरिसीजडीबु
ट्टी ॥ तेणेभूतसृष्टीपावसील ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐकसुंद
रमंत्रयेक ॥ भवसिंधुतारकरामनाम ॥ ४ ॥ ३९८१ ॥

पापियाचांडाळाहरीकथानावडे ॥ विषयीआवडेगाणें
त्याला ॥ १ ॥ ब्राह्मणादक्षणादेतांरडेरुका ॥ विषयाला
गिफुकालुटीधन ॥ २ ॥ वीतभरलंगोटीनेदीअतिताला ॥
भोरपयांसिशालावांटीतसे ॥ ३ ॥ तुकाह्मणेत्याच्याथुं
कातोंडावरी ॥ जातोयमपुरीभोगावया ॥ ४ ॥
॥ ३९८२ ॥

क्षुधार्थीदुष्काळअन्नेंपीडीयेलें ॥ मिष्टान्नदेखीलेंतेणें
जैसें ॥ १ ॥ तैसेंतुझेपाईलाचावलेंमन ॥ झुरेमाझाप्रा
णभेटावया ॥ २ ॥ माजरेंदेखीलालोणियाचागोळा ॥
लावूनियांडोळाबैसलेंसे ॥ ३ ॥ तुकाह्मणेझडीघालूंपा
हेपाहे ॥ पांडुरंगमायेतुझेपायीं ॥ ४ ॥ ॥ ३९८३ ॥

स्वामीससंकटपडेज्यागोष्टीचें ॥ कायत्याप्रेमाचेंसुख

मज ॥ १ ॥ दुखवीनाचित्ततुझेंनारायणा ॥ कांहींचमा
गेनातुजपासीं ॥ २ ॥ रिद्धिसिद्धिमोक्षसंपत्तिविलास ॥
सोडियेलेआसयांचीजीवें ॥ ३ ॥ तुकाह्मणेयेकवेळेदे
ईभेटी ॥ वोरसोनिपोटींआलिंगावें ॥ ४ ॥ ॥ ३९८४ ॥
देवतिहींबळेंधरिलासायासें ॥ करूनियांनाशउपाधी
चा ॥ १ ॥ पूर्वपक्षिधातुधिक्कारिलेजन ॥ स्वयेंजनार्द
नतेचीझाले ॥ २ ॥ तुकाह्मणेयासीनचलेतातडी ॥ अ
नुभवेंगोडीयेइलकळों ॥ ३ ॥ ॥ ३९८५ ॥
भेटिवांचोनीयांदुजेंनाहींचित्तीं ॥ येणेंकाकुलतीयाज
साठीं ॥ १ ॥ भेटोनियांबोलेआवडीचेंगूज ॥ आनंदा
च्याभोजें जेऊंसंगें ॥ २ ॥ मायलेंकरासीनाहींदुजिपरी ॥
जेऊंबरोबरीबैसोनीयां ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐसेंअंतरींचे
आर्त ॥ यावेंजित्वरीतनारायणा ॥ ४ ॥ ॥ ३९८६ ॥
आमिषाचेआशेगळगिळीमासा ॥ फुटोनियांघसा
मरणपावे ॥ १ ॥ मरणाचेवेळेकरितळमळ ॥ आठवी
कृपाळतयेवेळीं ॥ २ ॥ अंतकाळींज्याचेनामआलेंमु
खा ॥ तुकाह्मणेसुखापारनाहीं ॥ ३ ॥ ॥ ३९८७ ॥
जायाचेंशरीरजाइलक्षणांत ॥ कांहागोपीनाथपावेचि
ना ॥ १ ॥ तुह्मीसंतसारेकृपेचेसागर ॥ निरोपहाफारसां
गादेवा ॥ २ ॥ अनाथअज्ञानकोणीनाहींत्याला ॥ पा
यांपेंविठ्ठलाठेवींमज ॥ ३ ॥ तुकाह्मणेऐसीकरानिरव
ण ॥ मगतोरक्षणकरीमाझें ॥ ४ ॥ ॥ ३९८८ ॥
त्रासलाहाजीवसंवसारींच्यासुखा ॥ तुजविणसखा

नाहींकोणी ॥ १ ॥ ऐसेंमाझेंमनींवाटेनारायणा ॥ घा
लावीचरणावरीमिठी ॥ २ ॥ कईंतेंसुंदरदेखेनरूपडें ॥
आवडीच्याकोडेंआलिंगीन ॥ ३ ॥ नाहींपूर्वपुण्यमज
पामरासी ॥ ह्मणोनिपायांसींअंतरलों ॥ ४ ॥ अलभ्य
लभ्यकेंचासंचितावेगळा ॥ विनवीगोपाळादासतु
का ॥ ५ ॥ ॥ ३९८९ ॥

मोलाचेंआयुष्यवेंचोनियांजाय ॥ पूर्वपुण्यहोयलाभ
त्याचा ॥ १ ॥ अनंतांजन्मींचाशेवटपाहातां ॥ नरदेहहा
ताआलातुझ्या ॥ २ ॥ करालतेंजोडीयेईलकार्यासी ॥
ध्यावेंविठ्ठलासीसुखालागीं ॥ ३ ॥ साचलियाधनहोइ
लठेवणें ॥ तैसिनारायणेंजोडीकरा ॥ ४ ॥ कराहरिभ
क्तिपरलोकींकामा ॥ सोडवीलयमापासुनीयां ॥ ५ ॥
तुकाह्मणेकराआयुष्याचेंमोल ॥ नकावेंचूंबोलनामें
वीण ॥ ६ ॥ ॥ ३९९० ॥

कायसुखआहेवाउगेंबोलतां ॥ ध्यातांपंढरिनाथाकष्ट
नाहीं ॥ १ ॥ रामकृष्णनामींरसनारंगली ॥ अमृतउक
ळीनामतुझें ॥ २ ॥ सर्वकाळवाचेउच्चारितांहरी ॥ तया
सुखासरीपारनाहीं ॥ ३ ॥ तुकाह्मणेधन्यतयाचेंवदन ॥
जयानारायणध्यानींमनीं ॥ ४ ॥ ॥ ३९९१ ॥

कीर्तनाच्यासुखेंसुखीहोयदेव ॥ पंढरीचारावसंगींअ
से ॥ १ ॥ भक्तजायसदाहरिकीर्तिगात ॥ त्यासवेंअनंत
हिंडतसे ॥ २ ॥ त्रैलोकींभ्रमणकरीतनारद ॥ त्यासंगें
गोविंदफीरतसे ॥ ३ ॥ नारदमंजुळस्वरेंगीतगाय ॥ मा

गींचालताहेसवेंहरी ॥ ४ ॥ तुकाह्मणेत्यालागोडीकीर्त
नाची ॥ नाहींआणिकांचीप्रीतिऐशी ॥ ५ ॥ ३९९२॥
बाळमायेविणक्षणभरिनराहे ॥ नदेखतांहोयकासा
वीस ॥ १ ॥ आणिकउदंडबुझाविततरी ॥ छंदत्याअं
तरींमाऊलीचा ॥ २ ॥ नावडतीतयाबोलआणिकांचे ॥
देखोनियांनाचेमायदृष्टी ॥ ३ ॥ तुकाह्मणेमाझीविठ्ठल
माऊली ॥ आणिकांचेबोलीचाडनाहीं ॥ ४ ॥ ३९९३॥
हरिचियादासानाहींभयचिंता ॥ दुःखनिवारीतानारा
यण ॥ १ ॥ नलगेवाहाणेंसंसारउद्वेग ॥ जडोंनेदिपांग
देवराव ॥ २ ॥ असोंघावाधीरसदासमाधान ॥ आहे
नारायणाजवळीच ॥ ३ ॥ तुकाह्मणेमाझासखापांडुरं
ग ॥ व्यापियेलेंजगतेणेंयेक ॥ ४ ॥ ॥३९९४॥
दसरादिवाळीतोचिमाझासण ॥ सखेहरिजनभेटती
ल ॥ १ ॥ अमुपजोडिल्यापुण्याचीयारासी ॥ पारत्या
भाग्यासीनाहींलेखा ॥ २ ॥ धन्यदिवसआजीझालासो
नियाचा ॥ पिकलीहेवाचारामनामें ॥ ३ ॥ तुकाह्मणे
कायहोऊंउतराई ॥ जीवठेऊंपाईंसंताचिये ॥ ४ ॥
॥३९९५॥
हाचिमाझ्यामनेंधरियेलाधंदा ॥ याबरिगोविंदाभेटी
घावी ॥ १ ॥ हाचिमाझाध्यासस्सदासर्वकाळ ॥ न्यावया
सीमूळयेसीकधीं ॥ २ ॥ डोळियांचिभूकपाहातांश्रीमु
ख ॥ आलिंगनेंसुखनिवतींभुजा ॥ ३ ॥ बहुचित्तवोढत
याचियेसोई ॥ पुरलाहाकाईनवसनेणें ॥ ४ ॥ बहुबहुका

ळझालोंकासावीस ॥ वाहिलेंबहुवसकलेवर॥ ५॥ तु
काह्मणेआतांपडावेंहेंवोझें ॥ पांडुरंगामाझेंइयावरी॥
॥६॥ ३९९६॥
जेणेंमाझेंहितहोईलतोउपाव॥करिसीलभावजाणोनी
यां ॥ १ ॥ मजनाहींसुखदुःखतयांखंती ॥ भावनाहीं
चित्तींनानाछंदें ॥ २ ॥ तोडींहिसंबंधतोडींआशापा
श ॥ मजहोसायासनकरितां ॥ ३ ॥ तुकाह्मणेमीतो
राहिलोंनिश्चित ॥ कवळोनियेकांतसुखतुझें ॥ ४ ॥
॥३९९७॥
शिखासूत्रतुझागुंतलाजमान॥ तवरीतूंजाणश्रुतिदा
स॥१॥त्याचितुजकांहींचुकतांचिनीत॥होसीलपतीत
नर्कवासी ॥ २ ॥ बहुतूंझालासीचतुरशाहाणा॥शुद्ध
आचरणाचुकोंनको ॥ ३ ॥ शिखासूत्रयाचातोडींतूं
संबंधूं ॥ मगतुजबोधूनाहींनाहीं ॥४॥ तुकाह्मणेतरीव
र्तुनिनिराळा ॥ उमटतीकळाब्रह्मींचिया ॥ ५ ॥
॥३९९८॥
पतिव्रताऐसीजगामध्येंमात ॥ भोगिपांचसातअंधा
रींतें॥ १ ॥ भ्रतारासिलेखीश्वानाचेसमान ॥ परपुरुषीं
जाणसंभ्रमतो॥ २ ॥ तुकाह्मणेतिच्यादोषानाहींपार॥
भोगितीअघोरकुंभीपाक॥३॥ ॥३९९९॥
सिंदळीसनाहींपोराचीपैंआस ॥ राहेबीजत्यासकाय
करी॥ १ ॥ अथवाशेतींबीजपेरिलेंभाजून॥सारादेइल
कोणकाकात्याचा॥ २ ॥ तुकाह्मणेनाहींराखायाचिचा

ड॥ तरीकांलिगाडकरुनिघेतो॥३॥ ॥४०००॥

संसाराआलीयायेकसुखआहे ॥ आठवावेपायविठो बाचे॥ १ ॥ येणेंहोयसर्वसंसारसुखाचा॥ नलगेदुःखा चालेशकांहीं॥ २ ॥ घेतीलतयासीसोपेंआहेसुखें॥ बो लियेलेंमुखेंनारायण ॥ ३ ॥ सांगितलीसोयकरुणा सागरें॥ तुह्माकांहोबरेंनवाटेतें ॥ ४ ॥ तुकाह्मणेतेणेंउ पकारकेला॥ भोळ्याभाविकांलातरावया॥ ५॥

॥४००१॥

चालेहेंशरीरकोणाचियेसत्ते ॥ कोणबोलवीतेहरीवी ण॥१॥देखवीऐकवीएकनारायण॥तयाचेंभजनचुकों नको॥ २ ॥मानसाचिदेवचालवीअहंता॥ मीचयेकक र्ताह्मणोंनये॥३॥ वृक्षाचींहींपानेंहालेत्याचीसत्ता॥रा हिलीअहंतामगकोठे॥ ४॥ तुकाह्मणेविठोभरलासबा ह्य॥ उणेंकायआहेचराचरीं॥ ५ ॥ ॥४००२॥

मायारूपेंऐसेंमोहियेलेजन॥ भोगितीपतननानाकर्मे ॥ १ ॥ काययाचीप्रीतिकरितांआदर ॥ दुरावितांदूरते चीभले॥ २॥ नानाछंदेंअंगींवैसतिविकार॥ छळिये लेफारतपोनीधी॥ ३॥ तुकाह्मणेऐसेंशिकवितोंतूज॥ आतांधरींलाजमनापुढें॥ ४॥ ॥४००३॥

जेजेमजकांहींहोइलवासना॥तेतेनारायणाव्हावेंतुह्मी ॥ १ ॥ कायभावयेकनिवडूंनिराळा ॥ जाणसितूंकळा अंतरींची॥ २ ॥ तुजवीणमजकोणआहेसखा ॥ जो सांगोआणिकाजीवभाव ॥ ३ ॥ अवघेपिशूनझालें

असेजन ॥ आपपरकोणनाठवेहें ॥ ४ ॥ तुकाह्मणेतूं चिजीवाचेंजीवन ॥ माझेंसमाधानतुझेंहातीं ॥ ५ ॥

॥ ४००४ ॥

कसिकरूंआतांसांगतुझीसेवा ॥ शब्दज्ञानेंदेवानाशकेला ॥ १ ॥ आतांतुझेंवर्मनकळेअनंता ॥ तुजनसांगतां बुडोंपाहे ॥ २ ॥ संध्यास्नानकेलीआचाराचीनासी ॥ कायतयापासीह्मणतियेक ॥ ३ ॥ बुडविसीभक्तिह्मणतीपाषाण ॥ पिंडाचेंपाळणस्थापूनीयां ॥ ४ ॥ नकरावी कथाह्मणतियेकादशी ॥ भजनाचीनाशीमांडियेली ॥ ॥ ५ ॥ नजावेंदेउळाह्मणतीदेवघरीं ॥ बुडविलेंयापरी तुकाह्मणे ॥ ६ ॥

॥ ४००५ ॥

नमानेचितूजमाझेंहेंकरणें ॥ कायझालेंउणेंकरितांस्नान ॥ १ ॥ संतांचामारगचालतोंझाडूनी ॥ नेणेलाभहाणीकांहींतरी ॥ २ ॥ नकरिसीलतरीहेंचिकोडेंमज ॥ भक्तिगोडकाजआणिकनाहीं ॥ ३ ॥ करींसेवाकथानाचेनरंगणीं ॥ प्रेमसुखधणीपुरेलतों ॥ ४ ॥ महाद्वारींसुखवैष्णवांच्यामेळीं ॥ वैकुंठजवळीवसेतेथें ॥ ५ ॥ तुकाह्मणेनाहींमुक्तिसवेंचाड ॥ हेंचिमजगोडजन्मघेतां ॥ ६ ॥

॥ ४००६ ॥

होऊनिसंन्यासीभगवींलुगडीं ॥ वासनानसोडीविषयाची ॥ १ ॥ निंदीतीकदान्नइच्छीतीदिव्यान्न ॥ पाहतातीमानआदराचा ॥ २ ॥ तुकाह्मणेऐसेदांभीकतेजन ॥ तयांजनार्दनभेटेकेवी ॥ ३ ॥

॥ ४००७ ॥